**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्र सरकारने कांद्याच्या खरेदी भावात केली १३ टक्के वाढ
- राज्यात सहकारी संस्थाचे जाळं अधिक मजबूत करण्यासाठी वेगळा सहकार शिक्षण निधी उभा करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- केंद्रीय गृहमंत्रालयाकडून २३ पाकिस्तानी नागरिक दहशतवादी म्हणून घोषित

**आणि**

- राज्यात पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत

<><><><><>

केंद्र सरकारने कांद्याचा खरेदी दर १३ टक्क्यांनी वाढवला आहे. हा दर १ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटलवरून २ हजार १२५ रुपये प्रति क्विंटल केला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने ही माहिती दिली. सुधारित खरेदी दर आजपासून लागू झाला आहे.. सरकारच्या किंमत स्थिरीकरण धोरणाअंतर्गत 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत कांद्याची खरेदी सध्या सुरू आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, कांद्याचं उत्पादन ३०७ लाख मेट्रिक टनांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये सध्या पुरेसा साठा असून, कांद्याच्या तुटवड्याची कोणतीही चिन्हं सध्या दिसत नाहीत, असंही मंत्रालयाने सांगितलं. देशात कांद्याचा सरासरी किरकोळ दर ३१ रुपये प्रति किलो इतका आहे. कांद्याची निर्यातही सामान्य असून, या वर्षी जून महिन्यात सुमारे १ लाख ५० हजार मेट्रिक टन कांद्याची निर्यात झाली आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय सहकार दिवसानिमित्त आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि अमित शाह यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. शेतकरी, महिला तसंच छोटे उद्योजक यांना बळ देण्यात सहकारी संस्था महत्वाची भूमिका बजावतात असं उपराष्ट्रपतींनी त्यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारताची परंपरा, सर्वंकष बळ आणि

आत्मनिर्भरता याचा पाया सहकारिता आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वात सहकारी संस्था भरारी घेत आहेत असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

<><><><><>

खरेदी किंवा वारसा हक्काने २०१९ च्या अंतिम दिनांकानंतर शेतजमीन प्राप्त करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना पी एम किसान आणि नमो शेतकरी योजनांचे लाभ द्यावेत अशी मागणी राज्यातल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे केली आहे. उत्पादनाचा संपूर्ण खर्च सोसून प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना या लाभांपासून वंचित ठेवणं अन्यायकारक असल्याचं महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेनं म्हटलं आहे. प्रशासनानं पात्रता निकषांमध्ये सुधारणा करून शेतकऱ्यांचं प्रलंबित आर्थिक सहाय्य प्रदान केलं नाही तर राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा संघटनेनं दिला आहे.

<><><><><>

नवीन कुशल कामगार घडवण्यासाठी तसंच राज्यामधली सहकारी संस्थाचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी एक सहकार शिक्षण निधी उभा करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्य सरकारच्या सहकारी युनियन च्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रसरकारची सध्याची धोरणे ही देशाच्या जीडीपीमध्ये सहकारक्षेत्राचा वाटा तिपटीपर्यंत वाढवण्याच्या दिशेने आखलेली आहेत असं सांगत फडवणीस यांनी सहकार चळवळ पुढे जाण्यासाठी मनुष्यबळ आवश्यक असते, पर्यायाने त्यामध्ये गुंतवणूक करावी लागते असं स्पष्ट केलं. सहकारी क्षेत्राला बळकटी येण्यासाठी कुशल कामगार तयार होणे आवश्यक असते. यासाठी पूर्वी शिक्षण निधी असे. तो निधी पुन्हा सुरु करू असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्यानुसार केंद्रीय गृहमंत्रालयानं २३ पाकिस्तानी नागरिकांना दहशतवादी म्हणून घोषित केलं आहे. हे लोक जैशे मोहम्मद, लष्कर ए तैय्यबा सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित असून जम्मू काश्मीरमध्ये घुसखोरी, शस्त्रं पुरवणं आणि हल्ल्यांची योजना आखणं यामध्ये त्यांचा हात आहे. या घोषणेमुळे राष्ट्रीय तपास

संस्थेसारख्या सुरक्षा संस्थांना या लोकांची मालमत्ता जप्त करता येईल आणि बँक खाती गोठवता येतील जेणेकरून त्यांच्याकडून होणारी शस्त्र खरेदी थांबता येईल.

**<><><><><>**

अयोध्येतल्या श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासानं प्रशासकीय आणि आर्थिक बाबींसंबंधी चर्चा करण्यासाठी येत्या सोमवारी सदस्यांची बैठक बोलावली आहे. न्यासाला प्राप्त होत असलेल्या देणग्यांच्या मोजणीचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकानं नोंदवलेल्या निरीक्षणांबाबतही या बैठकीत चर्चा होईल. याशिवाय, सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ अनिल मिश्रा यांनी सादर केलेल्या राजीनाम्यांसह राम मंदिराच्या आगामी व्यवस्थापनाशी संबंधित बाबींचाही बैठकीच्या विषयपत्रिकेत समावेश आहे.

**<><><><><>**

राज्याच्या अनेक भागात पावसानं संततधार धरली आहे. राजधानी मुंबई सह कोकणात मुसळधार पावसामुळे जनजीवन प्रभावित झालं आहे. मुंबईतल्या स्थितीचं सविस्तर वृत्त आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - व्हॉईस कास्ट - मोहिते - -**

*मुसळधार पावसाने गेले चार दिवस मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, पालघर या या भागांना झोडपलं आहे. मुंबईत गेल्या ४ दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे मुंबईतल्या माटुंगा इथं तिन्ही रेल्वे मार्गांवरची वाहतूक सुमारे १०-१५ मिनिटं उशिरानं सुरू असून रस्ते वाहतूक सुरळीत असल्याची माहिती पालिकेच्या आपत्कालीन विभागानं दिली आहे. काल रात्री माटुंगा परिसरात एक झाड उन्मळून पडल्यानं अनेक वाहनं खराब झाली, तर दादर इथल्या फुल मार्केट जवळही एक झाड कोसळलं.*

*मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रात पाऊस सुरू असून सर्व धरणातला पाणीसाठा वाढत आहे. मुसळधार पावसामुळे मोगरा नाला तुडुंब भरून वाहत असून, मोगरा नाला प्रणालीशी जोडलेले लहान नालेदेखील वाहत आहेत. परिणामी, परिसरातील काही रस्त्यांवर पाणी साचल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. समुद्रात उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी मुंबईतील पावसाच्या परिस्थितीचा आपत्कालीन व्यवस्थापन कक्षातून आढावा घेतला. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी पावसाचा आढावा घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला..*

***बाईट - फडनवीस***

*मेट्रो मार्गिका २अ च्या तांत्रिक बिघाडावर महा मुंबई मेट्रोच्या पथकाने तात्काळ युद्धपातळीवर काम सुरू करून अल्पावधीतच तो दूर केला. या काळात प्रवाशांची गैरसोय कमीत कमी राहावी यासाठी बिघाडग्रस्त मार्गावर दुरुस्तीचे काम सुरू असतानाच दुसऱ्या मार्गावरून मेट्रो सेवा अखंडपणे सुरू ठेवण्यात आली.*

*नवी मुंबई परिसरात गेल्या चार तासात ४९ मी.मी पावसाची नोंद झाली आहे. आज पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला असल्याने शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान शहरातील उरण फाटा परिस , वाशी सेक्टर २९, ऐरोली गाव सेक्टर १, सानपाडा सेक्टर २, एपीएमसी, एमआयडीसी परिसरात पाणी साचलं आहे. तर ६ ठिकाणी झाडं उन्मळून पडली आहेत.*

*पालघर जिल्ह्यातही दमदार पाऊस पडत आहे. जिल्ह्यातले नाले भरुन वाहत आहेत. जिल्ह्यातल्या तांदुळवाडी किल्ल्यावर पर्यटनासाठी गेलेले 6 जण खराब हवामानामुळे किल्ल्यावरच अडकले होते. या पर्यटकांना सफाळे पोलिसांनी सुखरुप बाहेर काढलं. हे पर्यटक किल्ल्यावरुन परतत असताना जोरदार पावसामुळे भरकटले होते.*

ठाणे जिल्ह्यातही सातत्याने पावसाच्या सरी येत आहेत.

रायगड जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी पोलादपूर - महाबळेश्वर हा आंबेनळी घाट रस्ता 3 ते 6 जुलै असे ४ दिवस पूर्णत: बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात सातत्याने सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. एका आठवड्यात वार्षिक सरासरीच्या तब्बल १७ टक्के पाऊस पडला असून, हंगामात आतापर्यंत एकूण २५ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

**भाडारा** जिल्ह्यात गोसीखुर्द धरणातून अडीच हजार क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे.

**<><><><><>**

जालनामार्गे पंढरपूरला जाणाऱ्या श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळ्याचा रिंगण सोहळा उद्या जालन्याच्या जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. संत मुक्ताबाईची

पालखी ही वारकरी संप्रदायातील मानाच्या सात पालख्यांपैकी एक असून उद्या साडेसात ते साडेनऊ या वेळात हा रिंगण सोहळा होणार आहे.

**<><><><><>**

वाशीम जिल्ह्यात कुपटा घाटात काल सकाळी साडेदहाच्या सुमारास भरधाव डंपरने कारला धडक दिल्यामुळे अपघात झाला. या अपघातात कारमधल्या दोघा जणांचा जागीच मृत्यू झाला.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यात अंबड तालुक्यातल्या शहापूरजवळ आज दोन बसची टक्कर होऊन झालेल्या अपघातात २५ जण जखमी झाले. जालना-वडीगोद्री महामार्गावरील गल्हाटी नदीच्या पुलावर सकाळी सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

**//<><><><><>//**